नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

(तिसरी वेळ जाहीरात)

जा.क्र.नांवाशमनपा/साप्रवि/आस्था-सेल/ 13464 /२०२५
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड
दिनांक : 05 FEB 2025

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील भुसंपादन विभागाकरीता संपादीत करण्यात आलेल्या जागेचे भुसंपादन प्रस्ताव व प्रक्रिया पुर्ण करण्यासाठी तात्पुरत्या स्वरुपात करार पध्दतीने नियुक्ती करण्यासाठी सेवानिवृत्त उपजिल्हाधिकारी किंवा तहसिलदार संवर्गातील अधिकाऱ्यांमधुन **"विशेष कार्यासन अधिकारी"** या पदासाठी नमुद अर्हताधारक पात्र उमेदवाराकडून खालील वेळापत्रकानुसार अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अर्ज स्विकारण्याचा तपशिल | |
|---|---|
| अर्ज स्विकारण्याचा दिनांक व वेळ | दिनांक ०६ /०२/२०२५ ते १७ /०२/२०२५ पर्यत कार्यालयीन वेळेत (सुट्टीचे दिवस वगळून) |
| स्थळ | नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, मुख्य प्रशासकीय इमारत (पहिला माळा) आवक विभाग (एक खिडकी) येथे स्विकारण्यात येतील. |

| अ.क्र. | पदाचे नांव | पदसंख्या | मासिक परिश्रमिक | अर्हता व अनुभव |
|---|---|---|---|---|
| १ | विशेष कार्यासन अधिकारी | ०१ | शासन निर्णय दि.१७.१२.२०१६ नुसार व वेळोवेळी झालेल्या सुधारीत शासन निर्णयानुसार | सेवानिवृत्त उपजिल्हाधिकारी किंवा तहसिलदार संवर्गातील अधिकारी व भुसंपादन विभागाचा अनुभव असणा-या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल, तथापि उपजिल्हाधिकारी किंवा तहसिलदार संवर्गातील अधिकारी उपलब्ध न झाल्यास, सदर पद भुसंपादन विभागाचा अनुभव असणा-या किमान गट-ब (राजपत्रित) संवर्गातील नगररचना किंवा भुसंपादन विभागातील सेवानिवृत्त अधिकारी किंवा सेवानिवृत्त नायब तहसिलदार संवर्गातुन भरण्यात येईल. |

नोट– सदर जाहिरात व अर्जाचा नमुना नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या www.nwcmc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

अटी व शर्ती –

१) सदरील भरती प्रक्रियेस महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक: संकिर्ण-२७१५/ प्र.क्र.१०० /१३ दिनांक १७.१२.२०१६ मधील तरतुदी व त्यात वेळोवेळी केलेल्या सुधारणा लागु राहतील.

२) अर्जासोबत जाहिरातीत नमुद आवश्यकती कागदपत्रे जोडावित (सेवानिवृत्ती आदेश, सध्याचे सेवानिवृत्ती वेतनाबाबतचा पुरावा)

३) मासिक पारिश्रमिक :- सदर पदावरील नियुक्त उमेदवारास उक्त शासन निर्णयातील तरतुदीनुसार राहील. अशा नियुक्तीच्या वेळी महागाई भत्यासह मिळत असलेल्या निवृत्ती वेतनाएवढी (अंशराशीकृत निवृत्ती वेतन वगळून) त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणुन निश्चित करण्यात येईल, तथापि इतर प्रकरणी उक्त शासन निर्णयातील ड (१) (क) मध्ये नमुद असल्यानुसार राहील.

Mahabharti.in

CS CamScanner

05-02-25

४) सदरील पदावरील नियुक्ती ही करार पध्दतीने असुन प्रथम सहा महिण्याकरिता नियुक्ती देण्यात येईल व त्यानंतर एक दिवसाचा तांत्रिक खंड देवून पुढील सहा-सहा महिण्याकरिता सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने पुर्ननियुक्ती देण्यात येईल.

५) सदरील पदासाठी उमेदवार सेवानिवृत्त अधिकारी शारीरीक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा, तसेच सबंधितांविरुध्द कोणतीही विभागीय चौकशी चालु अथवा प्रस्तावित नसावी. अशा चौकशी प्रकरणात शिक्षा झालेली नसावी.

६) वयोमर्यादा :- सदरील नियुक्ती करिता उमेदवार वयाच्या ६५ व्या वर्षापर्यंत राहील. तथापि यापुढेही महानगरपालिकेस सबंधितांच्या सेवेची आवश्यक असल्यास त्यास शासन निर्णयातील तरतुदीनुसार मान्यता घेवुन पुढे चालु ठेवण्यात येईल.

७) बंधपत्र/हमीपत्र :- सदरील पदावरील नियुक्त उमेदवारास बंधपत्र/हमीपत्र देणे बंधनकारक राहील.

८) विहीत मुदतीत कामावर रुजू न झाल्यास देण्यात आलेली नियुक्ती रद्द करण्यात येईल.

९) कामाचे स्वरुप व काम पुर्ण करणेसाठी अपेक्षित कालावधी ठरविण्याचे अधिकार महानगरपालिकेस निहित राहतील.

१०) करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे सबंधितास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाचे /सामावुन घेण्याचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार/हक्क नसेल.

११) नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा अधिकाऱ्यांच्या करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.

१२) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती, सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल, अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतलेला नसावी.

१३) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांना प्राप्त होणाऱ्या कागदपत्रे/माहिती व आधार सामुग्रीबाबत गोपनियता पाळणे आवश्यक राहील.

१४) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्य व्यक्तींनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील. त्यांच्या कामकाजाबाबत नियुक्तीसाठी सक्षम असलेले प्राधिकारी वेळोवेळी आढावा घेवुन कामाचे मूल्यमापन करतील.

१५) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार प्रदान करता येणार नाही.

१६) करार पध्दतीने नियुक्ती करतांना सामान्य प्रशासन विभाग आणि वित्त विभागाच्या सहमतीची आवश्यकता असणार नाही.

आयुक्त
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

प्रतिलीपी माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीस्तव –

१) जनसंपर्क अधिकारी, जनसंपर्क विभाग, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना देऊन कळविण्यात येते की, सदर जाहिराती सोबत संक्षिप्त नमुण्यातील जाहीरात दैनिकात कमीत कमी जागेत प्रसिध्द करावे.

२) सिस्टीम मॅनेजर, संगणक विभाग, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

३) मुख्य नोटीस बोर्ड, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

४) आवक-जावक विभाग, (एक खिडकी) नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांनी उक्त कालावधीत सोबत दिलेल्या विहीत नमुण्यातील अर्ज स्विकारुन अहवाल सादर करावा.

आयुक्त
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

Mahabharti.in

CS CamScanner

दिनांक :

**प्रति,**
मा.आयुक्त,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

**विषय : विशेष कार्यासन अधिकारी या पदासाठी अर्ज सादर करणेबाबत.**
संदर्भ : दैनिक ------------------------ वृत्तपत्रात प्रसिध्द झालेली जाहिरात दि. / /२०२५

उपरोक्त जाहिरातीच्या अनुषंगाने मी, विशेष कार्यासन अधिकारी या पदासाठी अर्ज सादर करीत असुन त्याबाबतची माझ्याशी सबंधित आवश्यकती ती माहिती खालीलप्रमाणे आहे.

१. उमेदवाराचे संपुर्ण नांव मराठीमध्ये (अडनांव प्रथम) :- ------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------------------

2. उमेदवाराचे संपुर्ण नाव IN ENGLISH CAPITAL LETTERS (SURNAME FIRST) :- ---------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------------------

3. पत्र व्यवहाराचा सध्याचा संपुर्ण पत्ता रा.------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------ भ्रमणध्वनी क्रमांक ------------------

४. कायमचा संपुर्ण पत्ता रा.------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------------------

५. जन्मदिनांक (अंकात) ------------------------ (अक्षरी) ------------------------------------------------------

६. जाहिरातीच्या दिनांकास वय (वर्ष, महिना, दिवस) ---------------------------------------------------------------

७. अर्जदाराने अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्र/प्रमाणपत्र ई.तपशिल ----------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------------------

मी असे प्रमाणित करतो/करते की, जाहिराती मधील सर्व अटी व शर्ती मान्य आहेत. तसेच अर्जात नमुद केलेली माहिती खोटी आढळल्यास माझी उमेदवारी नियुक्तीच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल आणि माझे विरुध्द कायदेशिर कार्यवाही होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण : -
दिनांक : -

उमेदवाराचे संपुर्ण नांव व स्वाक्षरी